स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विद्यापीठाच्या मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत

राज्यशास्त्र विषयातील **पीएच.डी.** या पदवीसाठीच्या सादर करावयाच्या

शोधप्रबंधाची रूपरेषा

''गणपतराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास''

संशोधक

प्रियांका पांडुरंग सरगर

एम. ए., बी. एड.

मार्गदर्शक

डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर

राज्यशास्त्र विभाग

आझाद महाविद्यालय, औसा

संशोधन केंद्र

राज्यशास्त्र विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड

गणपतराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास

....

प्रस्तावना: Introduction

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि जनसामान्यावर आपल्या विचार आणि कार्यकर्तृत्वाच्या जोरावर प्रभुत्वाचा ठसा उमटवून भक्कम अधिष्ठान प्राप्त करणाऱ्या समाजशील राजकीय नेतृत्वात गणपतराव देशमुख यांचे नाव अग्रक्रमावर घेतले जाते. गणपतराव देशमुख यांचा जन्म १० ऑगस्ट १९२७ रोजी पिंपरी ता. मोहोळ जिल्हा सोलापूर येथे झाला. मोहोळ पंढरपूर मार्गावर वसलेले पेनूर हे भाई गणपतराव देशमुख यांचे मूळ गाव त्यांचे बालपण मुळगावी गेले. त्यांचे कुटुंब हे वारकरी संप्रदायाचे असल्याने त्यांच्यावर उत्तम संस्कार घडले. साधे राहणीमान उच्च विचारांचे संस्कार त्यांमुळे त्यांच्यावर झाले. त्याकाळातील मॅट्रिकनंतर ते पुढील शिक्षणासाठी पुण्यात गेले. त्याकाळात भारतीय स्वातंत्र्य लढा तीव्र झालेला होता. या लढयाकडे ते आकर्षित झाले. त्याकाळी कॉंग्रेस विचारसरणीच्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात ते आले. १९४८ साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झालेली होती. त्यावेळचे शंकरराव मोरे, नाना पाटील या लोकांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यानंतर ते डाव्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला कार्ल मार्क्सचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. ते स्वत: शेतकरी कुटुंबातील होते, शेतकरी, शेतमजूर, कामगार, गरीब वंचित समाजघटकांच्या प्रश्नांची त्यांना जाण निर्माण झाली होती. हा समाजघटक सुखी झाला पाहीजे असे त्यांचे मत होते. शरद पवार यांचे थोरले बंधू अप्पासाहेब पवार आणि गणपतराव देशमुख पूण्यात एका खोलीत राहत होते. कामगार, कष्टकरी सर्वसामान्य लोक त्यांना आदराने आबासाहेब म्हणत, इतका प्रभाव त्यांच्या नेतृत्वाचा जनसामान्यावर निर्माण झाला होता.

गणपतराव देशमुख यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव होता. मार्क्सच्या तत्वाज्ञानाचा भारताच्या संदर्भात विचार करून त्याचा भारतीय समाजजीवनासाठी कसा उपयोग करता येईल हा मुलभूत प्रश्न त्यांच्यासमोर होता. समाजातील शेतकरी, कामगार, कष्टकरी लोकांचे त्यांच्यावर मार्क्सच्या विचारांचा प्रभाव असल्याने त्यांना डाव्या विचारसरणीचा लोकनेता म्हणून पुढे ओळख

झाली. पुणे येथे त्यांनी बी.ए. झाल्यानंतर इंडियन सोसायटीच्या लॉ कॉलेजमधून एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण केले.

गणपतराव देशमुख यांची एक राजकीय नेतृत्व म्हणून जडणघडण:

राजकीय नेतृत्वाची जडणघडण होण्यासाठी विशिष्ट घटक कारणीभूत जसे असतात तसे सभोवताली असणारी परिस्थिती सुध्दा कारणीभूत असते. नेतृत्व निर्मितीला काही घटक प्रभाव टाकत असतात. गणपतराव देशमुख यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव होता त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण घेतानाच श्री वसंतराव तुळपुळे व कमलाबाई भागवत यांच्याकडे शिकवणी लावली होती. शिकवणी लावून एखादी विचारसरणी जाणून घेण्याची गणपतराव देशमुख यांची जिज्ञासा विलक्षणच म्हणावी लागेल. मार्क्सवादाच्या प्रभावातून त्यांना शेतकरी, कामगार, गरीब, अल्पसंख्यांक, शोषित वंचित समाजघटकांच्या हितासाठी जनचळवळ संघटित करण्याची प्रेरणा मिळाली. महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची चळवळ संघटित करून सभा घेतल्या. शेतकरी कामगार पक्षाचे नेते तुळशीदास जाधव, केशवराव जेधे व शंकरराव मोरे इत्यादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. हे करीत असताना महात्मा गांधी आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडत होता. मार्क्सचा क्रांतिकारी विचार आणि आपल्या साध्या राहणीमानातून महात्मा गांधीजींच्या विचारांचा विलक्षण मेळ गणपतराव देशमुख यांनी आपल्या जीवनात घातला होता. मार्क्सच्या तत्वज्ञानाची सांगड घालून आपल्या समाज जीवनातील कामगार, मजूर, गरीब कष्टकरी सर्वसामान्य लोकाच्या कल्याणाचा मार्ग कसा मोकळा करता येईल हा विचार भाई गणपतराव देशमुख यांनी मांडलेला आहे. गणपतराव देशमुख यांनी आपल्या विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. नुसते विचारांचे इमले उभा न करता समाजजीवनाला जरा वेगळा पैलू देणारा विचार मांडून जनतेची चळवळ संघटित करण्याचे महत्वपूर्ण कार्य गणपतराव देशमुख यांनी केले.

राजर्षी छ. शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव गणपतराव देशमुख यांच्यावर पडलेला होता. या महापुरूषांच्या विचारांचा त्याना परिस्पर्श झाल्यांने त्यांची जडणघडण ही तत्ववैचारिक, मानवतावादीदृष्टी अधिक प्रगल्भ अशी झाली

होती. या विचारपरंपरांचा स्पर्श ज्या पिढीला झाला होता त्या पुरोगामी विचार परंपरेचे गणपतराव देशमुख वारसदार ठरले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

राज्य ही उपभोगण्याची गोष्ट नसून त्याचा उपयोग समाज हित आणि परिवर्तनासाठी करायचा असतो हा छ. शिवाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर यांच्या विचारांचे सारतत्व भाई गणपतराव देशमुख यांनी अंगी उतरविले असल्यांनी १९५४ मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ, १९६१ मध्ये गोवा मुक्ती अंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यांचा लोकशाहीच्या सनदशीर मार्गावर विश्वास होता पण महाराष्ट्रात लोकशाहीच्या माध्यमाने आलेल्या सत्तेचा वापर मुठभर भांडवलदार आणि श्रीमंत लोकांच्या हिताच्या रक्षणासाठी झाल्यास शोषित वंचित समाज, शेतकरी, कष्टकरी कामगार, अल्पसंख्यांक, शेतमजूर यांना वाऱ्यावर सोडले जाईल या समाजघटकाच्या सर्वांगिण कल्याणासाठी राजकारणाची गरज त्यांना वाटली त्यामुळे त्यांनी राजकारणात प्रवेश केला. २१ मे १९६१ रोजी गणपतराव देशमुख यांनी सांगोल्यात शेतकरी परिषद घेतली याप्रसंगी क्रांतिसिंह नाना पाटील उपस्थित होते. १९६१ च्या ऑक्टोबर महिन्यात त्यांनी महाराष्ट्र विधानसभा लढविण्याचे ठरविले.

१९६२ साली महाराष्ट्रात पहिल्या विधानसभा निवडणूकीत भाई गणपतराव देशमुख यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमाने निवडणूक लढण्याचे निश्चित केले. त्यांना कॉंग्रसमध्ये येण्यासाठी स्वत: यशवंतराव चव्हाण यांनी विचारणा केली तरी सुध्दा ज्या चळवळीने आपल्याला नावारूपाला आपले त्या चळवळीसी बेईमानी मी करणार नाही ही ठाम भूमिका गणपतराव देशमुख यांनी घेतली आपल्या तत्वांना कोणत्याही क्षणी सोडायचे नाही ही रास्त भूमिका होती. आपले विचार आणि कृतीत कधीच अंतर पडता कामा नये. माझा विचार, आचार हा कष्टकरी, शेतकरी गोरगरीब जनतेच्या हितासाठी आहे हा विचार त्यांनी जनसामान्यासमोर मांडला आणि ही निवडणूक जिंकली.तेव्हापासून शेवटपर्यत दोन वेळी अपवाद वगळता सलग ११ वेळा विधानसभा आमदार म्हणून निवडून येण्याचा ग्रिनिज बुक रेकॉर्ड भाई गणपतराव देशमुख यांच्या नावे असणे ही त्यांच्या कार्यकर्तृत्वाची खूप मोठी जमेची बाजू आहे. गणपतराव देशमुख यांचा एक राजकीय नेतृत्व म्हणून उदय झाल्यानंतर त्यांनी विविध कार्यातून आपल्या नेतृत्वाचा ठसा जनसामान्यात उमटविला हे करीत असताना त्यांनी समाजहिताच्या राजकारणा

बरोबर विविध जनचळवळी संघटित केल्या ज्या सर्वसामान्य जनता, शेतकरी, कामगार, कष्टकरी, शेतमजूर, शोषित वंचित समाजघटक यांच्या हिताचे राजकारण आणि समाजकारण केले. त्यांच्या जनचळवळीत जलसिंचन, शेत मालाला रास्त भाव, बांधकाम, मृदा संधारण, पाटबंधारे, दुष्काळ, आपत्ती व्यवस्थापन, शेतीपुरक व्यवसाय, रोजगार हमी अशा विविध घटकांवर जनचळवळ संघटित करून त्याचे यशस्वी नेतृत्व केले. गणपतराव देशमुख एक राजकीय नेतृत्व म्हणून समाजजीननाला दिशादर्शक वाटतात. म्हणून आज एक राजकीय नेतृत्व म्हणून त्यांच्यावर संशोधन करण्याची गरज वाटते.

विषयाचे महत्व: Importance of the Study

गणपतराव देशमुख हे एक राजकीय नेतृत्व म्हणून महाराष्ट्राच्याच नाही तर सबंध देशाच्या राजकारणासाठी दिशादर्शक आहे. समाजकारण आणि राजकारण याला तत्ववैचारिक बैठक देवून समाजहिताचे राजकारण कसे करावे याचे उत्तम उदाहरण हे गणपतराव देशमुख यांचे राजकीय विचार, त्यांचे राजकारण अणि त्यांनी केलेल्या जनचळवळी आहेत. आजच्या जात, जमातवादी आणि तत्वशून्य राजकारणाच्या पार्श्वभूमीवर भाई गणपतराव देशमुख यांच्यासारखे मोजकेच नेतृत्व आज दिसत आहे. एक राजकीय नेतृत्व म्हणून त्यांची उंची वाढतच गेलेली दिसते. राजकीय नेतृत्व कसे असावयास हवे हे गणपतराव देशमृख हे एक उत्तम उदाहरण म्हणून आपण त्यांच्याकडे पाहू शकतो. ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर सलग ११ वेळा विधानसभा निवडणूक जिंकुन जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले ही या नेतृत्वाची विलक्षण गोष्ट आहे.त्यांनी केलेले एक राजकारण, समाजकारण तसेच त्यांचे राजकीय विचार आणि जनचळवळींची त्यांची व्यापक दृष्टीची समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून आजच्या संदर्भात प्रस्तुत विषयाचे महत्व अधिक वाढलेले आहे.

समस्या विधान: Statement of Problem

महाराष्ट्राच्या राजकारणाची आजच्या संदर्भातील दिशा लक्षात घेता. भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, कामगार आणि वंचित शोषित घटकांचा एकत्रित विचार करता या समाजघटकांच्या हितांचे विविध प्रश्न हे आजही गंभीर बनलेले आहेत. गणपतराव देशमुख याच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर त्यांनी या समाजघटकांसाठी राजकारण आणि समाजकारण केले. त्यांचे राजकीय विचार, त्यांनी केलेले

समाजघटकासाठीचे राजकारण आणि त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संघटित केलेल्या विविध जनचळवळीचे तंत्र याआधारे आज निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची सोडवणूक करता येईल असे वाटते. म्हणून प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याची गरज निर्माण झालेली आहे. गणपतराव देशमुख यांचा एक राजकीय नेतृत्व या परिप्रेक्षात अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे.
.

संशोधनाची उद्दिटये: Objective of Study

१. गणपतराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. गणपतराव देशमुख यांच्या राजकारणाला जाणून घेणे.

३. गणपतराव देशमुख त्यांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या जनचळवळींचा अभ्यास करणे

४. गणपतराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाचा प्रभाव समजून घेणे.

५. गणपतराव देशमुख यांचे नेतृत्व, विचार आणि त्यांनी संघटित केलेल्या जनचळवळीची चिकित्सा करणे.

गृहितके: Hypothesis

१. गणपतराव देशमुख यांच्यासारख्या नेतृत्वाची राजकीय प्रस्तुतता आज अधिक वाढलेली आहे.

२. गणपतराव देशमुख यांचे राजकारण आणि नेतृत्व तत्वांचे आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताचे होते.

३. गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ज्या जनचळवळी संघटित केल्या त्यामुळे सर्वसामान्यांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली तसेच समाजात आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती झाली.

४. गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वामुळे सांगोला मतदार संघाचा विकास झाला आहे.

५. गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वाच्या आधारे आज निर्माण झालेले विविध प्रश्न सोडविता येतील.

संशोधनाची व्याप्ती: Scope of the Study

प्रस्तुत विषयावरील संशोधनाची व्याप्ती हे गणपतराव देशमुख यांचे राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित आहे. प्रस्तुत विषयाची मांडणी करीत असताना केवळ गणपतराव देशमुख या नेतृत्वाचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला जाईल.

संशोधन पध्दती: Research Methodology

प्रस्तुत विषयावर संशोधन करीत असताना संशोधनाच्या ऐतिहासिक व ग्रंथालयीन पध्दतीचा अवलंब केला जाईल. त्यासाठी अभ्यासाच्या प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा आधार घेतला जाईल. या आधारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषणात्मक पघ्दती तसेच तुलनात्मक पध्दतीचा अवलंब केला जाईल.

प्राथमिक साधने : Primary Data

प्राथमिक साधनात भाई गणपतराव देशमुख यांनी स्वत: केलेले लेखन, ग्रंथ, लेख आदिंचा समावेश केला जाईल.

दुयम साधने : Secondary Data

दुयम साधनात प्रस्तुत विषया संबंधित विविध लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, लेख, अप्रकाशित साहित्य, नोंदी, शासकीय कागदपत्रे, शासकीय निर्णय, चर्चासत्रातील चिंतन अशा विविध साधनावचा समावेश केला जाईल.

प्रकरण योजना: Chapter Scheme

१. प्रस्तावना

अ. प्रस्तुत विषयावरील पूर्वसंशोधनाचा संक्षिप्त आढावा

ब. संशोधन पध्दती

२. गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वाचा उदय

३. गणपतराव देशमुख यांचे राजकारण आणि राजकीय योगदान

४. गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वाची सांगोला मतदार संघातील विकासात्मक कामगिरी

५. गणपतराव देशमुख यांच्या राजकीय नेतृत्वाची चिकित्सा

६. उपसंहार

संदर्भ ग्रंथसुची :

मराठी—

१. भारतीय शेतकरी कामगार पक्ष विविध अधिवेशनातील संमत ठराव

२. भारतीय शेतकरी कामगार पक्ष विविध अधिवेशनातील मध्यवर्ती चिटणीस मंडळांचे अहवाल

३. बोधनकर व अलोणी विवेक १९९३: सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

४. भारतीय शेतकरी कामगार पक्ष आयोजित मंत्रालय विराट मोर्चा प्रसिध्दिी पत्रक ०७ एप्रिल २०११, आझाद मैदान मुंबई.

५. भारतीय शेतकरी कामगार पक्ष विविध अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणे.

६. बुध्दीसागर मा. ग. सोलापूर जिल्हयातील सहकाराची वाटचाल, सोलापूर जिल्हा लोकल बोर्ड, प्रकाशन, सोलापूर १९५४

७. भोळे भा. ल. २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.

८. गणपतराव देशमुख, करात वृंदा: रोजगार हमी योजना महाराष्ट्राची आणि केंद्र सरकारची, प्रबोधन प्रकाश, समाजवादी प्रबोधीनी, इचलकरंजी २००५

९. कुंभोजकर ग. वी. १९८९: संशोधन पध्दती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर

१०. लिगाडे नानासाहेब २०२३, आठवणीतील भाई गणपतराव देशमुख, शब्दशिवार प्रकाशन, मंगळवेढा .

११. महाराष्ट्रातील शेतकरी सभा १०—११ जानेवारी १९७०, गणपतराव देशमुख यांचे भाषण

१२. माने किसन, २०२२: राजकीय मानदंड भाई गणपतराव देशमुख, सायन पब्लिकेशन, पूणे.

१३. महाराष्ट्र विधानसभा अधिवेशन कामकाज अहवाल १९६२ ते २०११

१४. पाणी संघर्ष परिषदेचे प्रसिध्दिी पत्रक २६ जुलै २००५ ठिकाण आटपाडी.

१०.पन्नालाल सुराणा, झेपावणारा ग्रामीण महाराष्ट्र, नानासो लिगाडे, सांगा २००८

११.संग्राम, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मासिक मुखपत्र

१५. सा. जनसत्ता, शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र

इंग्रजी–

1. Government of Maharashtra, Gazetteer of India Maharashtra State Solapur District Bombay Revised Ed. 1977
2. Kamlapurkar J.N. The deccan Forths 1st ed. 1961
3. Kothari C. B. 1985 : Research Methodology , Methods and Techniques Wiley Eastern Limited, New Delhi
4. Herekar P. M. Research Methodology and project work Phadke Prakashn Kolhapur.
5. Ahuja ram 2008: Research Methods Rawat Publication, Jaipur.

मासिक / त्रैमासिक / साप्ताहिक

१. प्रबोधन प्रकाशन ज्योति

२. समाज प्रबोधन पत्रिका

३. सुगावा

४. साधना

५. परिवर्तनाचा वाटसरू

६. Economical and Political Weekly

७. Frontline

८. The Week

संशोधक

प्रियांका पांडुरंग सरगर

मार्गदर्शक

डॉ. दिलीपकुमार डी.क्षीरसागर

Dr. Kshirsagar D. D.
Research Guide and Head,
Dept. of Political Science,
Azad Mahavidyalaya
AUSA, Dist.Latur